RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ८, अंक ५२] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर २९, २०२२-जानेवारी ४, २०२३/ पौष ८-१४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

संकीर्ण सूचना व जाहिराती

### जिल्हा परिषद, बीड
### (सामान्य प्रशासन विभाग)

### अधिसूचना

क्रमांक जिपबी/साप्रवि/आस्था-१४/कावि-२७०/२०२२

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम (वार्षिक प्रशासन अहवाल) प्रसिद्ध करणे सुधारणा नियम, १९६६-८१ प्रमाणे विहित प्रपत्रात वार्षिक प्रशासन अहवाल जिल्हा परिषद, बीड सन २०२१-२०२२ चा तयार केला असून दिनांक १३ सप्टेंबर २०२२ च्या **शासन राजपत्रानुसार** जिल्हा परिषदेमध्ये सर्वसाधारण सभेचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केले आहेत. दिनांक १३ सप्टेंबर २०२२ च्या **शासन राजपत्रानुसार** मा. मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा परिषदेचे प्रशासक म्हणून कामकाज पाहतात. त्याअनुषंगाने जि.प. बीड वार्षिक प्रशासन अहवाल सन २०२१-२०२२ यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक यांनी मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध झाल्याची माहिती या अधिसूचनेद्वारे सर्वांना देण्यात येत आहे.

बीड,
दिनांक १३ डिसेंबर २०२२.

**अजित पवार** (भाप्रसे),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड.

**ZILLA PARISHAD, AKOLA**

*NOTIFICATION*

No. ZP/GAD/EOS/AAR/2021-22/2458/2022

In pursuance of the provision of section 142 (4) of the Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samiti Act, 1961 and rule 9 of the Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samiti rules (Publication of Annual Administration Report) 1964, I Saurabh Katiyar, Chief Executive Officer, Zilla Parishad, Akola hereby notify the publication of Annual Administration Report for the year 2021-22 as approved by the Zilla Parishad, Akola in its General Meeting *vide* resolution number 04 (Four) dated 25th November 2022.

Akola,
Dated 21st December 2022.

SAURABH KATIYAR, I.A.S.
Chief Executive Officer,
Zilla Parishad, Akola.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

## जाहीर निवेदन

क्रमांक रा.म./सभा-घटना/६८०२

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ कलम ५(१) वर्ग ब(१) अन्वये **महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर** यांच्या **दिनांक २८ सप्टेंबर, २०२२** रोजीच्या विद्या परिषदेच्या **८१ व्या बैठकीच्या ठराव क्रमांक ३ नुसार व दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ च्या पत्रानुसार** विद्या परिषदेने राज्यमंडळावर **डॉ. प्रमोद नामदेव रसाळ** यांची विद्यापीठ प्रतिनिधी सदस्य म्हणून निवड केली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या राज्यमंडळावरील सदस्यत्वाची मुदत राहील अथवा महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशाच्या अधीन राहून अथवा मंडळ अधिनियम, १९६५ मधील कलम क्रमांक ८(१) मधील तरतुदीनुसार **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून चार वर्षाचा कालावधी अथवा त्यांचा सेवानिवृत्ती दिनांक यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेस राज्यमंडळावरील सदस्यत्व संपुष्टात येईल.

राज्यमंडळाचे सदस्य म्हणून वेळोवेळी निवडून आलेल्या किंवा नामनिर्देशित किंवा पदनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्यांची नावे त्या मंडळाकडून **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील, अशी तरतूद असल्याने **डॉ. प्रमोद नामदेव रसाळ** यांचे नाव **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येत आहे.

पुणे,
दिनांक १५ डिसेंबर २०२२.

**अनुराधा ओक**,
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४११ ००४.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.